# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/2407/2023-24** **दि.05/01/2024**

**<u>मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या</u> अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण व नगररचना विभागात <u>ठोक मानधनावर सहायक विधी अधिकारी उपलब्ध करुन घेणेबाबत.</u>**

।।**<u>जाहीर सूचना</u>**।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण व नगररचना विभागात कायद्याविषयक बाबी हाताळण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात 06 महिन्याकरीता ठोक मानधनावर सहायक विधी अधिकारी Walk in Selection पध्दतीने भरावयाचे असल्याने पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे. खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता पूर्ण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज व आवश्यक त्या प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रतींचा एक संच व मूळ प्रमाणपत्रांसह मा. स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि.ठाणे-401101 येथे दि.18/01/2024 रोजी **सकाळी** 10.00 **ते** 1.00 वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी उपस्थित राहावे.

- **सहायक विधी अधिकारी - 03 पदे (ठोक मासिक मानधन रु.40,000/- सर्व भत्त्यांसह)**
- <u>शैक्षणिक अर्हता :-</u>

  **अ**) मान्यता प्राप्त विद्यापीठाची विधी शाखेची पदवी.

  ब) महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण, मुंबई यांचेकडील अधिकृत एम.एस.सी.आय.टी परीक्षा उत्तीर्ण.

  क) मराठी भाषेचे ज्ञान आवश्यक.

- <u>भरती प्रक्रिया गुणांकनाची पध्दत 100 गुणांची असेल :-</u>

  1. विधी पदवीकेस मिळालेल्या Agreegate Weightage गुणानुसार 80 पैकी.
  2. Subject Knowledge (Oral) 20 पैकी

टिप- उपरोक्त गुणांकनाच्या पध्दतीमध्ये बदल करण्याचे अधिकार मा.निवड समिती अध्यक्ष, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना राहतील.

- <u>सर्वसाधारण सुचना :-</u>

1. **<u>वयोमर्यादा :-</u>**

   1.1 सहायक विधी अधिकारी (ठोक मानधन) पदासाठी वयोमर्यादा किमान 18 वर्षे पूर्ण व कमाल 38 वर्षे असून, अर्जदार मागासवर्गीय असल्यास वयोमर्यादा ही 43 वर्षे राहील.

   1.2 अर्जदार/उमेदवाराचे वयासाठी जाहीरात प्रसिध्दतीच्या दिवशीचे वय विचारात घेतले जाईल.

